आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.२५

# विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समायोजनात शालेय नेतृत्वाची भूमिका

# The Role of School Leadership in the Adjustment of Students with Special Needs

**प्रस्तावना -**

आधुनिक समाजाच्या आणि राष्ट्राच्या जडणघडणीतील शालेय शिक्षणाचे महत्वाचे स्थान सर्वच समाज सुधारकांनी व राष्ट्रपुरुषांनी अधोरेखीत केले आहे. मनुष्यबळ ही देशाची संपत्ती आहे. मनुष्यबळ विकसनातून देशविदेशातील अनेक अपूर्व संधी आपली देशातील तरुणांपुढे उभ्या आहेत. मात्र शिक्षणाच्या माध्यमातून त्या मनुष्यबळाचे ज्ञानात्मक आणि कौशल्यात्मक मूल्य वाढवावे लागणार आहे.



प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या उद्दिष्टानुसार प्रत्येक मुलास प्राथमिक शिक्षण नजीकच्या नियमित शाळेत पूर्ण करण्याचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये म्हणजेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार प्राप्त झालेला आहे. त्यामुळेच सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा विचार करणे अपरिहार्य आहे. विद्यार्थ्यांच्या गरजा वेगवेगळ्या असतात. त्यांचे विशेष गुण क्षमता व कमतरता यांचा विचार करून त्यांच्यासाठी आवश्यक अशा शिक्षणाची पूर्तता करणे आवश्यक आहे.

प्रत्येक शाळेमध्ये काही विद्यार्थी असे असतात जे सामान्य विद्यार्थ्यांपेक्षा वेगळे असतात. त्या विद्यार्थ्यांसाठी विशेष शिक्षणाची आवश्यकता असते. बरेचदा विशेष मुले शालेय कार्यक्रमात सहभागी होत नाहीत. जगातील कोणत्याही शाळेतल्या वर्गात प्रवेश केला तर सर्वच मुले एकसारखी किंवा सर्वसामान्य प्रवृत्तीची आढळून येणार नाहीत. वर्गातील जवळपास १० ते १५ टक्के विशेष विद्यार्थी आढळतात. त्यातील काही विद्यार्थी गतिमंद असतात. काहीमध्ये शारीरिक दोष असतात. काही मुले मूकबधीर, कर्णबधीर असतात. काहींच्या हातपायात दोष असतात. काही चंचल, बडबडे, काही तोतरे, बोबडे असतात. काही मुले सुस्त, शांत, घुमे, मत्सरी, हळवी, घाबरट, निर्दयी असे असतात. अशा सर्वच प्रकारच्या विद्यार्थ्यांना डोळयासमोर ठेवून वर्गाध्यापन करावे लागते. अन्यथा ही मुले शिक्षणापासून वंचित होवू शकतात. अशा प्रकारच्या मुलांना विशेष सोयी, सवलती, संधी पुरविल्या तर ही मुले सुद्धा योग्य दिशेने प्रगती करून जीवनात यशस्वी होवू शकतात. या मुलांना शिक्षणव्यवस्थेने, मुख्याध्यापक, शिक्षक, विशेष शिक्षक तसेच पालक यांनी सामावून घ्रेणे गरजेचे आहे.

शिक्षण हक्क कायद्यान्वये प्रत्येक बालकासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे मोफत व सार्वत्रिक झालेले आहे. शिक्षण मिळणे हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार आहे. सर्वसामान्य बालकांबरोबरच विशेष गरजा असणाऱ्या बालकांना शिक्षण प्रवाहात सहभागी करून घेणे खूप आवश्यक आहे.



**विशेष सुविधा पुरविल्यास मुले प्रगत होतात**

समावेशित शिक्षणांतर्गत विशेष गरजा असणाऱ्या अध्ययन अक्षम, मतीमंद, कर्णबधीर, वाचादोष. दृष्टीदोष, अस्थिव्यंग, स्वमग्न, बधीर, बहुविकलांग इ. विद्यार्थ्यांसाठी समावेशित शिक्षण हा महत्वाचा उपक्रम राज्यातील सर्व दुर्गम, अतिदुर्गम, ग्रामीण व शहरी भागात सुरु आहे. विशेष गरजा असणारी बालके सुद्धा इतर सर्वसाधारण मुलांसोबत शिकू शकतात फक्त त्यांना काही विशेष सोयी सुविधा पुरविण्याची गरज आहे. बरेचदा दिव्यांग किंवा विशेष गरजा असणाऱ्या बालंकाकडे समाजातील लोक सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून पाहतात. त्यांच्या मध्ये असणाऱ्या कमतरतेकडे समाजातील किंवा परिसरातील अन्य लोकांचे सतत लक्ष जाते. समस्याग्रस्त मूल म्हणून त्याच्याकडे बघितले जाते. हा नकारात्मक दृष्टीकोन बदलवून सकारात्मक दृष्टीकोनातून त्यांच्याकडे बघणे व त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विशेष गुण असतात. काही विशेष कौशल्ये असतात.

त्यांच्या कौशल्याप्रमाणे मुलांना संधी उपलब्ध करून देणे ही शाळेची आणि पर्यायाने मुख्याध्यापक शिक्षक व पालक यांची जबाबदारी आहे. अनेकदा आपण बघतो बरेच अंध किंवा अल्पदृष्टी व्यक्ती, मुले यांचा आवाज खूप छान असतो. संगीत किंवा गायन या कौशल्यात त्यांना गती असते. त्यांना दिसत नाही या कमतरतेकडे न बघता त्यांचा आवाज छान आहे या सकारात्मक बाबीकडे जर लक्ष केंद्रित केले तर नक्कीच त्यांच्यातील कौशल्य ओळखून तशी संधी मुलांना उपलब्ध करून देता येईल. या विद्यार्थ्यांचा शोध घेवून सर्वसाधारण मुलांच्या शाळेत त्यांना दाखल करणे व त्यांच्या गरजा ओळखून त्या गरजाप्रमाणे सुविधा पुरविणे ही मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या विशेष गरजांच्या नोंदी लेखी स्वरुपात घेतली गेल्या व त्यानुसार शालेय विकास आराखडा तयार केला गेला तर मुख्याध्यापकांना त्यानुसार काम करता येईल. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये प्रचंड उर्जा असते. शिकण्याची इच्छा असते.. प्रत्येक मूल शिकू शकते या गोष्टी लक्षात घेवून प्रत्येक मुख्याध्यापक व शिक्षकाने मूल शिकण्यासाठी अनुकूल वातावरण शाळेत मुलांना उपलब्ध करून द्यावे. आनंददायी पद्धतीने अध्ययन अनुभूती दिली तर नक्कीच मूले शाळेत येतात, टिकतात आणि शिकतात. विद्यार्थ्यांच्या मानसिक, भावनिक व शैक्षणिक गरजा असतात. ही मुले अधिक संवेदनशील असतात. त्यांना सुरक्षिततेची गरज असते. या सर्व गरजा पूर्ण करून त्यांच्यामध्ये गुणवत्ता विकसित करणे त्यांना शिकते करणे ही जबाबदारी प्रामुख्याने शिक्षक, मुख्याध्यापक व पालक यांच्यावर असते. त्यामुळे या तिन्ही व्यक्तीचा एकमेकांसोबत समन्वय असावा. सगळयांच्या समन्वयातून या मुलांची प्रगती करावी. प्रत्येक मूल त्याच्या दिव्यांगत्वाने नाही तर त्यांच्या नावाने, त्यांच्यामध्ये असलेल्या कौशल्याने ओळखल्या जावे. ही मुले जेव्हा सर्वसामान्य मुलांच्या शाळेत येतात तेव्हा त्यांचे सामाजिकीकरण होते. त्यांना मित्रमैत्रिणी मिळतात. शिक्षक, पालक व मुख्याध्यापकाकडून त्यांचा स्वीकार होतो. त्यांना प्रेरणा मिळते. परिणामी त्यांच्यातील न्यूनगंड नाहीसा होतो. त्यांना सुरक्षितता मिळते. त्यांची भावनिक मानसिक गरजेची पूर्तता होते. मुलांची प्रगती होते. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमीत शाळेत प्रवेश देण्यात यावा. यापैकी काही बालके शाळेत कधीही आलेली नसतात. अशा विलंबत्वाची शीघ्र लक्षणे दिसली तर अशा बालकांसाठी शीघ्र हस्तक्षेप कार्यक्रम, बहुविकलांग बालकांना गृह मार्गदर्शनाद्वारे टप्पा टप्प्याने नियमित शाळेत आणून शिक्षणातील विविध विषयांच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट करण्यास व कौशल्य विकसित करण्यास मदत होते. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय व भौतिक शैक्षणिक सहाय्यभूत सेवा पुरविण्यात येतात. यामध्ये प्रामुख्याने प्रत्येक तालुक्यास सरासरी ४-७ विशेष शिक्षक देण्यात आले आहेत. तर महानगरपालिका क्षेत्रात १८-३० विशेष शिक्षक देण्यात आले आहेत. अति दुर्गम भागात असलेल्या अतितीव्र दिव्यांगत्व असलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या हक्काचे शिक्षण व आनंद मिळावा यासाठी त्या स्वयंसेवकाची शाळा व्यवस्थापन समितीमार्फत व्यवस्था करण्यात येते.

- ✧ अंध विद्यार्थ्यांचे ब्रेल लेखन कौशल्य विकसित करण्यात येते.
- ✧ स्नायू व सांध्यांतर्गत दोष असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फ़िजिओ, ऑक्युपेशनल थेरेपिस्ट, वाचा व कर्णदोष असलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्पीच थेरेपिस्ट द्वारे थियरी सेवा पुरविण्यात येतात.
- ✧ जे विद्यार्थी स्वतंत्रपणे शाळेत येऊ शकत नाहीत अशा तीव्र स्वरूपातील विद्यार्थ्यासाठी शाळेत ने-आण करण्यासाठी मदतनिसाची व्यवस्था करण्यात येते.

- ✧ ज्या ठिकाणी शाळेचे अंतर अधिक आहे व असुरक्षिततेमुळे मूल शाळेत येऊ शकत नाही अशा विद्यार्थ्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येतो.
- ✧ अस्थिव्यंग, बहुविकलांग, सेरेब्रल पाल्सी विद्यार्थ्यांना गरजेनुसार साहित्य साधने उपकरणे पुरविण्यात येतात. व्हीलचेयर, ट्रायसिकल, मॉडीफाय चेयर, कमोड चेयर, स्प्लींट, क्रचेस इ. लो-व्हिजन साहित्य, ठळक अक्षरातील पुस्तके कर्णबधीर विद्यार्थ्यांना श्रवण यंत्रे इत्यादी साहित्य व साधन उपलब्ध करून दिले जातात.

**विषय निवडण्यामागची कारणे -**

शिक्षण विभागात काम करत असतांना शाळा भेटी दरम्यान असे लक्षात आले की शाळेतील/वर्गातील काही विद्यार्थ्यांना अडचणी येतात. जेव्हा या अडचणींचा शोध घेण्यात आला तेव्हा लक्षात आले की काही मुलांना शारीरिक, मानसिक किंवा भावनिक स्तरावर विशेष गरजा पुरविण्याची आवश्यकता असते. एक गोष्ट या ठिकाणी नमूद करावी वाटते की ही मूले सर्वसाधारण मुलांसोबत, त्यांच्या शाळेत सहज शिकू शकतात. फक्त त्यांना काही सुविधा पुरविण्याची गरज आहे. नागपूर विभागामध्ये शासनाने पुरविलेल्या सुविधांमुळे विभागातील सर्व सहाही जिल्ह्यांमध्ये (वर्धा, चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोंदिया व गडचिरोली) अनेक ठिकाणी खूप चांगल्या पद्धतीने काम चालू आहे. शाळेतील मुख्याध्यापकांनी पुढाकार घेतला आणि या मुलांना प्रगत करण्याचे ठरविले तर नक्कीच त्याचा उपयोग होतो. काही शाळांनी विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रगत करण्यासाठी विशेष मेहनत घेतली व त्या मुलांना सर्वसामान्य आयुष्य जगण्यासाठी प्रवृत्त केले. या शाळांनी केलेले प्रयत्न सर्वांपर्यंत पोहचावे म्हणून त्या शाळांच्या यशोगाथा या मोड्यूल मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.तसेच विशेष गरजा असणारी मुले हा समाजाचा महत्वाचा घटक आहे. अप्रगत विद्यार्थीविहीन शाळा करण्यासाठी या मुलांचा विचार प्रत्येक टप्प्यावर करणे गरजेचे आहे. त्यांना शिक्षणापासून वंचित न ठेवता त्यांना आवश्यक, गरजेप्रमाणे सुविधा पुरवून पुढे नेणे, प्रगत करणे हे शिक्षण विभागातील प्रत्येक घटकाचे कर्तव्य आहे. त्याकडे सर्वांचे लक्ष असावे. प्रत्येकाला विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थांचे शिक्षण ही स्वत:ची जबाबदारी आहे असे वाटावे म्हणून हा विषय निवडण्यात आला.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -**

1. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे समायोजन ही संकल्पना समजून घेणे.
2. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे यशस्वीपणे समायोजन करणाऱ्या मुख्याध्यापकांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
3. समाज, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्याकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन विकसित करणे.

**विशेष गरजा असणारे विद्यार्थी -**

विशेष गरजा असणारे विद्यार्थी म्हणजे प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याकरिता विशेष सुविधेची, सवलतीची गरज असणारे विद्यार्थी होय. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ प्रकरण २, कलम ३ (२) नुसार अपंग व्यक्ती अधिनियम १९१५ (समान संधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) प्रकरण क्रमांक ५ कलम २६व २७ नुसार राज्यशासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांना विशेष गरजा असलेल्या प्रत्येक बालकाला

वयाच्या १८ वर्षापर्यंत सुयोग्य व संचारमुक्त वातावरणात शिक्षणाची समान संधी मिळवून देणे हे या धोरणात्मक निर्णयाद्वारे बंधनकारक ठरलेले आहे. अर्थातच केंद्रशासन,राज्यशासनाने जिल्हा, महानगरपालिका, पंचायत समित्या, त्यातील केंद्र यांनी ही जबाबदारी स्वीकारलेली आहे. त्याचप्रमाणे शाळा स्तरावर शाळा व्यवस्थापन समितीद्वारे या बालकांना शैक्षणिक सुविधा पुरविण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. RPWD Act २०१६ नुसार विशेष गरजा असणारे बालकांचे पुढीलप्रमाणे २१ प्रकार नमूद करण्यात आलेले आहेत.

1. अंध
2. कर्णबधीर
3. बहुविकलांग
4. बौद्धिक (मतिमंद)
5. अध्ययन अक्षम
6. स्वमग्न
7. अंशत: अंध
8. वाचादोष
9. सेरेब्रल पाल्सी
10. अस्थिव्यंग
11. हिमोफिलिया
12. थॅलेसेमिया
13. सिकलसेल आजार
14. मानसिक आजार
15. मल्टीपल स्क्लेरोसिस
16. पार्कीसन्स
17. कुष्टरोग निवारीत
18. मज्जासंस्थेचे तीव्र आजार
19. शारीरिक वाढ खुंटणे
20. स्नायूची विकृती
21. ॲसिड अॅटक व्हिक्टीम

वरीलप्रमाणे समस्या असणाऱ्या बालकांना मागे ठेवून चालणार नाही. त्यांना सर्वसाधारण मुलांच्या बरोबरीने आणण्यासाठी शैक्षणिक अडथळे दूर करून पूरक सहाय्यभूत सेवांची उपलब्धता करून देण्याची आवश्यकता आहे. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी त्यांच्या गरजाप्रमाणे शैक्षणिक पूरक साहित्य व सेवा मिळवून देणाऱ्या समुदायाची गरज आहे. शिक्षक,पालक, समाज यांच्या प्रयत्नातून हे काम होणार आहे. प्रत्येक घटकाने आपापली भूमिका समजून घेवून ती चोखपणे बजावली तर परिसरातील एकही विद्यार्थी त्यांच्या शिक्षणाच्या मूलभूत हक्क व आनंदापासून दूर राहणार नाही याची खात्री आहे.

**समायोजन -**

माणूस हा एक सामाजिक प्राणी आहे. तो समाजात राहतो. समाजातील लोकांसोबत परिस्थिती व वातावरणाशी जुळवून घेतो. यामुळे मनुष्याला जलद प्रगती करण्यास मदत झाली आहे. जुळवून घेण्याच्या या प्रक्रियेलाच समायोजन असे म्हणतात. विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे समायोजन करताना अनेक अडचणी येण्याची शक्यता असते. मुलांमध्ये असलेले वेगळेपण त्यामुळे आलेला न्यूनगंड समाजाबद्दल असलेली भीती, आत्माविश्वासाची कमतरता यामुळे समायोजन करणे कठीण जाते. यात मुख्याध्यापकाची भूमिका महत्वाची असते. मुख्याध्यापक हे शिक्षक,पालक, समाज व इतर यंत्रणा यांच्या मदतीने व समन्वयाने या मुलांच्या समायोजनाकरिता प्रयत्न करीत असतात. सामुहिक प्रयत्नातून या मुलांचे समायोजन चांगल्या पद्धतीने होऊन ती मुले स्वत:ची प्रगती करण्यास नक्कीच प्रवृत्त होतात.

**समावेशित शिक्षण- एक दृष्टीकोन -**

प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी शाळांचे, वर्गांचे आणि वर्गांतर्गत कृतीची दारे खुली आहेत. त्याद्वारे प्रत्येक बालकाला त्याच्या शिकण्याच्या गरजेनुसार सुविधा व संधी उपलब्ध करून देणे व शिकण्याची सर्वतोपरी मदत करणे म्हणजे समावेशित शिक्षण होय.

समावेशित शिक्षण म्हणजे मुलांना शाळेत प्रवेश देणे,शिक्षण प्रशिक्षण देणे त्यासोबतच समावेशित शिक्षणामध्ये अंतर्भूत असणारी मूल्ये आणि विश्वास अंगीकारणे होय.

**विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या शैक्षणिक व्यवस्थेची जबाबदारी -**

गावांमध्ये परिसरात जे विशेष गरजा असणारे विद्यार्थी आहेत अशा मुलांना घरी न ठेवता गावातील शाळेमध्ये प्रवेश घेण्याकरिता पालकांना प्रोत्साहित करण्याची जबाबदारी त्या गावातील शाळेतले शिक्षक व मुख्याध्यापक यांची आहे. काही पालक अशा प्रकारच्या मुलांना शाळेत पाठवू इच्छीत नाहीत. आपले वेगळे असलेले मूल शाळेत सुरक्षित राहील याची बरेचदा पालकांना खात्री नसते. मुलासोबतच पालक असुरक्षित असतात. मुख्याध्यापक, शिक्षक व विशेष शिक्षक यांनी पालकांना विश्वासात घेवून त्यांच्या मुलांसाठी असलेल्या सर्व सहाय्यभूत सेवा शाळेत उपलब्ध करून दिल्या जातील. त्या मुलांची शारीरिक,मानसिक भावनिक सुरक्षा राखली जाईल या बाबी सांगणे गरजेचे आहे. रॅम्प, कमोड टॉयलेट, मॉडीफाईड खुर्ची, व्हीलचेअर, श्रवण यंत्र, अंधकाठी, कुबड्या, चष्मे, मदतनीस, अध्यापनासाठी विशेष शिक्षक, स्पीच थेरपी, वर्गमित्र, वैद्यकीय तपासणी या सर्व सुविधा गरजेनुसार विद्यार्थ्यांना मुख्याध्यापकांनी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. फक्त साधने उपलब्ध करणे नव्हे तर या साधनाचा वापर मुले योग्य रीतीने करीत आहेत काय? त्या साधनांची उपयोगिता मुलाच्या दृष्टीने खरंच आहे काय? याचा आढावा घेणे आवश्यक आहे. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करता येईल या दृष्टीकोनातून शाळेतील किमान एक शिक्षक मदतनीस स्वयंसेवक व मुलांच्या पालकांना प्रशिक्षण देऊन तयार करणे गरजेचे आहे. हे विद्यार्थी शाळेत ये जा करण्यासाठी बसने प्रवास करीत असतील तर त्यांची बसमध्ये चढण्या उतरण्याची व्यवस्था बसचालक, वाहक, वर्गमित्र. परिचित व्यक्ती यांच्या मदतीने करणे गरजेचे आहे.

विशेष शिक्षकांच्या वेळापत्रकानुसार अध्यापन, भेटीच्या नोंदी व विद्यार्थी निहाय मासिक प्रगती अहवाल अद्ययावत ठेवणे ही मुख्याध्यापकाची जबाबदारी आहे. या मुलांना त्यांच्या गरजेनुसार सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. नियमित वर्गात, अतितीव्र विद्यार्थ्यांना (बहुविकलांग) गृहमार्गदर्शन, स्कूल रेडीनेस व विविध थेरपी सेवा प्रदान कराव्यात. तसेच या मुलांची उपस्थिती टिकविणे गरजेचे आहे. मुलांची अनुपस्थिती आढळल्यास त्यामागील कारणे शोधणे व अडचणी दूर करून पुन्हा त्या मुलाला/ मुलीला शाळेत उपस्थित ठेवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सर्व मुलांमध्ये ही मुले मिसळतील, एकत्र काम करतील, अभ्यास करतील, खेळतील अशा प्रकारचे वातावरण शाळास्तरावर निर्माण केले पाहिजे. तेव्हाच त्यांच्यातील न्यूनगंड कमी होऊन आत्मविश्वास वाढीस लागेल व त्यांच्यामध्ये आपण वेगळे नसून इतरासारखे आहोत ही भावना वाढीस लागेल.

**विशेष गरजा असणाऱ्या बालकांना नियमित शाळेत समावेशित करण्याचे फायदे**

- विशेष गरजा असणाऱ्या बालकांना नियमित शाळेत समाविष्ट करण्यामुळे मुलांची शैक्षणिक प्रगती होवू शकते.
- भावनिक, मानसिक व सामाजिक स्तरावर त्यांचा विकास होतो. मुलामध्ये आत्मविश्वास निर्माण होतो.
- स्वतंत्रपणे मूल काम करू शकते. दैनंदिन व्यवहाराचे अनुकरण करून शिकण्यास मदत होते.
- कला सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात समान संधी प्राप्त होते. विविध प्रकारच्या खेळाचे नियम लवकर माहिती होत्तात.
- सामाजिक एकीकरण होते. सामान्य समुदायामध्ये आपले जीवन घालवू शकतो असा आत्मविश्वास निर्माण होतो.
- विशेष बालके सामान्य व नजीकच्या शाळेत शिकत असल्याने पालकांना समाधान वाटते. मुलांच्या सुप्त गुणांचा विकास होण्यास संधी मिळते.
- मुलांमध्ये असलेला न्यूनगंड कमी होतो. अन्य विद्यार्थ्यांमध्ये मदतीची भावना निर्माण होवून नैतिक मूल्यांची जोपासना होते.

**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी घेतले जाणारे विशेष उपक्रम व त्यामधून मिळालेली फलश्रुती -**

शाळेच्या पटांगणात विशेष गरजा असणाऱ्या मुलांना फुलण्याची संधी मिळते. यामध्ये प्रत्येक घटकांची भूमिका महत्वाची आहे. मुख्याध्यापक,शिक्षक,विशेष शिक्षक, पालक, समाज सर्वांनी आपापल्या भूमिका व्यवस्थित पार पाडल्या तर नक्कीच या मुलांचा विकास होतो. विशेष गरजा असणारी मुले त्यांच्या दिव्यांगत्वामुळे शिक्षणापासून वंचित राहतात असे नसून गाव पातळीवर त्यांच्यासाठी मनापासून काम करणाऱ्या मंडळींची कमतरता व पालकांची उदासिनता, यामुळे ही मुले शिक्षणापासून वंचित होतात. या मुलासाठी काम करणाऱ्या व्यक्तींनी प्रथम विविध उपक्रमाचे नियोजन करणे आवश्यक आहे.

सर्व प्रथम गावात परिसरात तसेच शाळेत विशेष गरजा असणारी मुले आहेत काय याच प्रथम शोध घेऊन अशा प्रकारच्या मुलांची एक यादी तयार करावी. कोणत्या विद्यार्थ्याला कोणत्या प्रकारच्या मदतीची गरज आहे हे बघून गरज असल्यास त्या मुलांची प्राथमिक आरोग्य तपासणी जवळच्या आरोग्य केंद्रातून करावी. जिल्हा शल्य चिकित्सकाद्वारे तपासण्या, निदान व उपचाराची दिशा निश्चित करावी. शस्त्रक्रिया, पुर्वतपासणी व शस्त्रक्रिया जर गरज असेल तर करावी.आवश्यक साधनाचा पुरवठा करून ती सेवा गरजेनुसार विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी. शैक्षणिक व थेरपी संसाधन कक्ष तयार करावा. स्कूल रेडीनेस कार्यक्रम घ्यावा. या मुलांचे पालक, भावंडे, स्वयंसेवक, शिक्षक,विशेष शिक्षक, समावेशित शिक्षण तज्ञ आणि समन्वयक यांचे बहुअपंग प्रवर्ग शिक्षण प्रशिक्षण उपलब्ध करून देऊन या सर्व घटकांचे प्रबोधन व जाणीवजागृती करावी. या मुलांचे आई-वडील व समाजातील अन्य व्यक्ती यांचे समुपदेशन करून सर्वाना या उपक्रमाबाबत माहिती करवून द्यावी. अशा प्रकारच्या उपक्रमामुळे अनेक ठिकाणी विशेष गरजा असणाऱ्या मुलांना प्रगती करण्यास नक्कीच संधी मिळालेली आहे.

प्रत्येक शाळेत दुचाकी वाहन चालवण्यासाठी रॅम्पची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे दिव्यांग मूल वाहनाने थेट त्याच्या वर्गापर्यंत पोहचू शकते. महाराष्ट्र राज्यास या उपक्रमासाठी उत्कृष्ट

योगदानाबाबत गौरविण्यात आलेले आहे. गावागावातून विशेष गरजा असणारी मुले नियमित शाळेत दाखल होऊन शिकती झालेली आहेत.

**विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार मूल्यांकन व शैक्षणिक सवलती -**

दिव्यांग व्यक्तीचा अधिकार अधिनियम २०१६ ,RPWD -२८ डिसेंबर २०१६ नुसार विशेष शैक्षणिक गरजा असणाऱ्या बालकांमध्ये कोणताही भेदभाव न करता समावेशित शिक्षणाद्वारे सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबाबत नमूद केले आहे. शिक्षण विभाग अध्ययनार्थी या दृष्टीकोनातून सर्वच बालकांकडे बघत असून त्यांच्याकडून अपेक्षित बदल व अध्ययन निष्पत्ती मिळवण्यासाठी काम करत आहे. त्या अनुषंगाने विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांचे अध्ययन अध्यापन पद्धती व मूल्यमापनाची तंत्रे ही देखील विविध अध्ययन शैलीनुसार श्रवण, दृश्य, स्पर्श,बहु अध्ययन शैली (Audio learner, visual learner, kinaesthetic learner, multi learner) इ. अध्ययन शैलीनुसार असणे आवश्यक आहे. त्यासाठी अध्ययन पद्धतीनुसार मध्यस्थ (Facilitator) म्हणून वर्ग शिक्षकांनी अध्यापन करण्याची गरज आहे. विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग म्हणजे अंशत: अंध/ पूर्णत: अंध, कर्णबधीर, भाषा व वाचादोष. अस्थिव्यंग, मानसिक आजार, अध्ययन अक्षम, सेरेब्रल पाल्सी, स्वमग्न, बहुविकलांग, कुष्ठरोग निवारीत, शारीरिक वाढ खुंटणे, बौद्धिक अक्षम (मतिमंद) स्नायूंची विकृती, मज्जासंस्थेचा तीव्र आजार, मल्टीपल स्क्लेरॉसिस, थॅलेस्सेमिया, हिमोफेलीया, सिकलसेल आजार, ॲसिड अटॅक विक्टीम, पार्किंसन्स आजार इ. २१ प्रवर्गातील व इतर आव्हानात्मक परिस्थितीत आढळून आलेल्या विद्यार्थांना नजीकच्या शाळेत शिक्षण देताना सुयोग्य अध्ययन पद्धतीचा उपयोग करतात. या गोष्टींचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

**शालेय निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१७/(११८/१७)/एस.डी-६ दिनांक १६ ऑक्टोबर २०१८ नुसार -**

विशेष गरजा असणाऱ्या (दिव्यांग) विविध बहु अध्ययनशैलीच्या विद्यार्थ्यासाठी सर्वसाधारण विद्यार्थांना असलेल्या परीक्षा योजनेप्रमाणे मूल्यांकन न करता परीक्षा पद्धतीमध्ये अनुकूलन (Adaptive approach) करून देणे आवश्यक आहे. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी नजीकच्या सर्व व्यवस्थापनाच्या नियमित शाळेतच प्रवेश आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना अध्यापन सहाय्यभूत सेवा अनुकूलन परीक्षा/ मूल्यांकन पद्धती व शिक्षकांना मार्गदर्शन तसेच क्षेत्रीय यंत्रणा व समुदायाचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे.

पूर्व प्राथमिक ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विशेष शैक्षणिक गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे इतर सामान्य विद्यार्थ्यांच्या बरोबरीने प्रत्येक घटकांमध्ये मूल्यमापन/ मूल्यांकन न करता त्यांच्या अध्ययन शैलीनुसार ज्ञानाच्या, भाषेच्या विषयावार अनुकूलन अध्यापन मूल्यमापनाच्या पद्धती उपयोगात आणणे अपेक्षित आहे. प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावर (इयत्ता १ ली ते ८ वी) पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या शाळांमधील सर्व प्रकारच्या परीक्षांचे /

मूल्यांकनासाठी, सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरातील (इयत्ता ९ वी ते १२ वी) पर्यंतच्या परीक्षा पद्धतीमध्ये अनुकुलित मूल्यमापन/ मूल्यांकन पद्धतीचा उपयोग करण्यास या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी अध्ययन शैलीनुसार अनुषंगिक व्यवस्था व शैक्षणिक सवलतीच्या उपयोगास देखील या शासननिर्णयानुसार मान्यता देण्यात आली.

**विविध स्तरातील आव्हाने -**

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या उद्दिष्टानुसार प्रत्येक मुलास प्राथमिक शिक्षण नजीकच्या नियमित शाळेत पूर्ण करण्याचा अधिकार अधिनियम-२००९ अन्वये बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे. असे असले तरीही प्रत्यक्ष शाळा स्तरावर काम करतांना विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समायोजनाच्या कामात अनेक अडचणी येतात. त्या अडचणीवर मात करून मुख्याध्यापकाने या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी काम करणे महत्वाचे आहे. प्रत्येक समस्येवर उत्तर असतेच. ती समस्या सोडविण्याचे विविध मार्ग असतात. त्यातील एक मार्ग निवडून अडचणी दूर करता येतात. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे समायोजन या विषयाच्या अनुषंगाने विविध स्तरावरील आव्हाने स्वीकारून ध्येयाच्या दिशेने प्रयत्न करून मात करता आली तर निश्चितपणे या विषयाला न्याय मिळून ही मुले आनंदाने शिकती होण्यास मदत होईल.

**शिक्षक स्तरावरील आव्हाने -**

विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष पुरविणे, त्यांच्या समस्या, अडचणी समजणे, विविध सुविधा पुरविणे, त्यांना त्यांच्या गतीने पुढे नेणे, त्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी मदत करणे या सर्व बाबी खर तर आव्हानात्मक आहेत.कधी कधी वर्गातील मुलांची पटसंख्या खूप अधिक म्हणजे ५०-६० किंवा त्यापेक्षा जास्त असते अशा वेळी त्या वर्गाचा अभ्यासक्रम पाठ्यक्रम पूर्ण करण्याकडे शिक्षकांचा कल असतो. अशा वर्गामधून ५-१०% विशेष गरजा असणारी मुले असतीलही पण अशा प्रकारच्या सर्वच मुलांना शिक्षक वैयक्तिक मार्गदर्शन करू शकत नाही. प्रत्येकाच्या विशेष गरजा समजून घेऊन विशेष नियोजन करून, त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी लागते. काही वेळेला विविध प्रकारचे दिव्यांगत्व असणारी मुले वर्गात असतात. या मुलांच्या गरजा वेगवेगळया असतात. शिक्षकाला त्या दृष्टीने प्रशिक्षण मिळालेच असेल असे नाही. प्रशिक्षण मिळाले तरी वर्गात प्रत्यक्ष काम करणे आव्हानात्मक असते. शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना न्याय द्यावा.शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात गरजेनुसार सुविधा व सवलती पुरविण्यासाठी सतत प्रयत्नशील असेल तर नक्कीच या सुविधा मुलांपर्यंत पोहोचतील व मुले शिक्षणाच्या दृष्टीने एक-एक पाऊल पुढे टाकतील.

विशेष शिक्षकांना आठवड्यातून एकदा किंवा दोनदाच मुलांना भेटता येते कारण त्यांच्या कार्यक्षेत्रातील परिसरात त्यांची भेट (Visit) असते. त्यामुळे एकाच गावात २-४ दिवस सतत भेट देणे त्या शिक्षकांना शक्य होत नाही. काही गावे खूप दुर्गम भागात असतात. अशा वेळी वाहन उपलब्ध नसतात. नद्या, नाले डोंगर दऱ्या पार करीत त्या दुर्गम भागातील विशेष मुलापर्यंत पोहोचणे हे एक प्रकारचे आव्हानच असते. काही वेळा पालक आपल्या विशेष मुलांबाबत उदासीन असतात. तो देवरूपी आहे अशा प्रकारचे समज पालकांमध्ये असल्यामुळे कधी कधी पालकाकडून मुलांच्या शिक्षणासाठी फारसा प्रतिसाद मिळत नाही. काही वेळा विद्यार्थ्याकडून काहीही प्रतिसाद

मिळत नाही. विशेष शिक्षकाला खूप संयम ठेवावा लागतो. अशा प्रकारचे आव्हाने असली तरी या सर्व अडचणीवर उपाय शोधणे हे शिक्षक व मुख्याध्यापकांचे आद्यकर्तव्य आहे. आपापल्या गावात, कार्यक्षेत्रात मुलांना शाळेच्या प्रवाहात आणण्याचे काम सर्व जण करीत आहेत.






**पालक स्तरावरील आव्हाने**

कुटुंबात जेव्हा विशेष बालक जन्माला येते किंवा जन्माला आलेले बाळ थोडं मोठे झाल्यावर समजते की हे बाळ वेगळे आहे किंवा विशेष आहे तेव्हा तो पालकांसाठी एक प्रकारचा मोठा धक्काच असतो. त्यातल्या त्यात हे बाळ गावात आर्थिक स्तर कमी असलेल्या कुटुंबात जन्माला आले असेल तर पालकांची अवस्था खूपच वाईट असते. एकतर आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता रोज त्यांचा संघर्ष सुरु असतो. आणि विशेष बाळ जन्माला आले की एखादे संकट आल्यासारखंच त्यांना वाटते बाळाच्या समस्या वेगळया असतात; पण पालकांच्याही समस्या असतात. पालकांच्या मनातही मुलाबद्दल असुरक्षिततेची भावना असते. हे मूल व्यवस्थित शिकेल काय? हा स्वत:ची दैनंदिन काम करू शकेल काय ? आपल्यानंतर त्यांचे कसे? असे विविध प्रश्न पालकांसमोर असतात. पालकामध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होते. मुलांच्याबाबत ते अतिसंवेदनशील असतात. किंवा कधी कधी दुर्लक्ष ही करतात. दोन्ही बाबी टाळायला हव्यात. जे मूल तीव्र दिव्यांगत्व घेऊन जन्माला येते त्याच्या पालकांना त्याची काळजी वाटत असते.

या सर्व अडचणीवर मात करण्यासाठी पालकांमध्ये व समाजामध्ये या विषयीची जागरूकता असणे आवश्यक आहे. ही मुले पण छान शिकू शकतात. इतर मुलामध्ये मिसळू शकतात. शाळेत शिकून नाव कमावू शकतात. हा विश्वास जर पालकांच्या मनात एकदा निर्माण झाला तर नक्कीच पालकांचा त्यांच्या मुलाकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होईल व त्याची प्रगती करण्यासाठी ते कटिबद्ध असतील.

**समाज स्तरावरील आव्हाने -**

समाजामध्ये अनेक अनिष्ट रूढी, परंपरा दीर्घकाळापासून चालत आलेल्या आहेत. या रुढीचा पगडा समाजमनावर चांगलाच बसलेला आहे. दिव्यांग मूल म्हणजे मागच्या जन्मात केलेल्या पापाचे फळ आहे अशा प्रकारे समाजातील लोक विचार करतात. अशा मुलांमुळे आधीच धास्तावलेले पालक समाजाच्या टोमण्यामुळे आणखी निराश होतात. कायम न्यूनगंडात जगत राहतात मानसिक विकार किंवा इतर समस्या असलेल्या मुलांवर मानसोपचार व इतर उपचार आपण करू शकतो हा विचारच समाजातील लोक करत नाही. या गोष्टी मुलाच्या प्रगतीस बाधक ठरतात. समाजाचा या मुलांकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टीकोन बदलण्यासाठी शिक्षक मुख्याध्यापक यांनी समाजातील लोकांना प्रबोधन करणे आवश्यक आहे.

सततच्या सांगण्यामुळे,प्रशिक्षण, कार्यशाळा याद्वारे समाजातील लोकांच्या मनातील नकारात्मक भावना घालवून त्याचे प्रबोधन केले . तरच या मुलांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेल व या मुलांच्या प्रगतीसाठी समाजातील लोक सुद्धा पुढे येऊन हातभार लावतील.

समावेशित शिक्षण व एकूणच सर्व स्तरावरून होणाऱ्या प्रयत्नांमुळे विशेष मुलांच्या प्रगतीबाबत विचार गावागावात, शाळापर्यंत पोहोचलेला आहे. काही प्रमाणात पालकामध्ये समाजामध्ये जागरूकता निर्माण झाल्याचे अनेक मुख्याध्यापकांच्या यशोगाथांमधून दिसून येते.





**विद्यार्थी स्तरावरील आव्हाने -**

शारीरिक, मानसिक वेगळेपण असणारी (दिव्यांग) मूलं जेव्हा जन्माला येतात त्यानंतर पुढील काही दिवसात मूल वर्षाचे, दीड वर्षाचे झाल्यावर आई-वडील व कुटुंबियाच्या लक्षात ही बाब येते.
आई-वडिलांनी त्याला सहज स्वीकारले तर पुढील बाबी सोप्या होऊ शकतात. पण त्याला स्वीकारता आले नाही, तर मात्र मुलाचं वेगळेपण हे त्याच्या स्वत:साठी तसेच पालकांसाठी मोठे आव्हान ठरते. छोट्या बाळाच्या अनेक अडचणी व गरजा असतात. भावनिक, मानसिक, सुरक्षितता, शारीरिक आधार या गरजांची पूर्तता न झाल्यास मूल हे सर्वच दृष्टीने अस्थिर होते. कुटुंबात अशा मुलांना काही वेळा अतिशय जपले जाते किंवा दुर्लक्षित केले जाते. दोन्ही गोष्टी मुलांसाठी धोक्याच्या आहेत . त्या मुलाला आवश्यकतेपेक्षा जास्त सुरक्षितता दिली तर त्या मुलातील आत्मविश्वास वाढत नाही ते सतत दुसऱ्यावर अवलंबून होण्याचा संभव असतो. त्याला दुसऱ्यांचा आधार घेण्याची सतत गरज

पडते. आपण इतर मुलापेक्षा वेगळे आहोत, काहीतरी कमतरता आहे ही भावना बळावते व त्याचे खच्चीकरण होण्यास सुरुवात होते. आत्मविश्वासाचा अभाव असतो. त्यांच्यामध्ये न्यूनगंड निर्माण होतो. भावना व्यक्त करीत नाही, मुलांमध्ये मिसळत नाही. काही वेळेला ही मुले आक्रमक होतात, बरेच ठिकाणी या मुलांना अवहेलना, अपमान सहन करावा लागतो. त्यामुळे यांचे जीवन अस्थिर असते.

या सगळ्या परिस्थितीवर मात करून त्यांचे समायोजन करण्याची गरज आहे. त्यासाठी मुख्याध्यापकासह सर्वांनी आपापल्या भूमिका समजून घेवून त्यांचे काम जबादारीने पूर्ण केले तर नक्कीच या आव्हानावर मात करून विद्यार्थ्यांची प्रगती साधली जाईल.



**सांख्यिकीय माहिती –**

महाराष्ट्र राज्यात विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांची जिल्हानिहाय संख्या खालील तक्त्यात नमूद करण्यात आलेली आहे. वर्ग १ ते ८ मध्ये किती विद्यार्थी विशेष गरजा असणारे आहेत. त्यामध्ये मुलांची संख्या,मुलींची संख्या किती व एकूण विद्यार्थी संख्या सांगितलेली आहे. तसेच ९-१२ या इयत्तामध्ये शिकणाऱ्या विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुद्धा खालील तक्त्यात नमूद करण्यात आली आहे. ही सर्व विद्यार्थी यु डायस देता २०२०-२१ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळेतील जिल्हा परिषद, नगर परिषद व महानगरपालिका शाळेत शिक्षण घेणाऱ्या विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांची आहे.

| Code | district | MNC | Class 1 to 8 | | | Class 9 to 12 | | | Total CWSN | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total | Boys | Girls | Total |
| 2701 | Nandurbar | ZP | 601 | 537 | **1138** | 110 | 160 | **270** | 711 | 697 | **1408** |
| 2702 | Dhule | Dhule Municipal Corporation | 593 | 570 | **1163** | 247 | 233 | **480** | 840 | 803 | **1643** |
| | | ZP | 947 | 838 | **1785** | 232 | 179 | **411** | 1179 | 1017 | **2196** |
| 2703 | Jalgaon | Jalgaon Municipal Corporation | 286 | 168 | **454** | 160 | 91 | **251** | 446 | 259 | **705** |
| | | ZP | 2266 | 1675 | **3941** | 548 | 379 | **927** | 2814 | 2054 | **4868** |
| 2704 | Buldana | ZP | 3026 | 2301 | **5327** | 761 | 520 | **1281** | 3787 | 2821 | **6608** |
| 2705 | Akola | Akola Municipal Corporation | 224 | 153 | **377** | 5 | 2 | **7** | 229 | 155 | **384** |
| | | ZP | 1434 | 1068 | **2502** | 388 | 219 | **607** | 1822 | 1287 | **3109** |
| 2706 | Washim | ZP | 1199 | 980 | **2179** | 368 | 401 | **769** | 1567 | 1381 | **2948** |
| 2707 | Amravati | Amravati Municipal corporation | 265 | 168 | **433** | 94 | 75 | **169** | 359 | 243 | **602** |
| | | ZP | 1899 | 1508 | **3407** | 566 | 419 | **985** | 2465 | 1927 | **4392** |
| 2708 | Wardha | ZP | 1451 | 1034 | **2485** | 442 | 370 | **812** | 1893 | 1404 | **3297** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **2709** | **Nagpur** | Nagpur Municipal Corporation | 518 | 347 | **865** | 333 | 261 | **594** | 851 | 608 | **1459** |
| | | ZP | 2211 | 1705 | **3916** | 925 | 1069 | **1994** | 3136 | 2774 | **5910** |
| **2710** | **Bhandara** | ZP | 1475 | 1092 | **2567** | 594 | 580 | **1174** | 2069 | 1672 | **3741** |
| **2711** | **Gondiya** | ZP | 1397 | 1026 | **2423** | 606 | 522 | **1128** | 2003 | 1548 | **3551** |
| **2712** | **Gadchiroli** | ZP | 1775 | 1566 | **3341** | 603 | 618 | **1221** | 2378 | 2184 | **4562** |
| **2713** | **Chandrapur** | ZP | 2093 | 1595 | **3688** | 709 | 621 | **1330** | 2802 | 2216 | **5018** |
| **2714** | **Yavatmal** | ZP | 2111 | 1772 | **3883** | 291 | 249 | **540** | 2402 | 2021 | **4423** |
| **2715** | **Nanded** | Nanded Municipal Corporation | 292 | 202 | **494** | 82 | 64 | **146** | 374 | 266 | **640** |
| | | ZP | 2298 | 1959 | **4257** | 464 | 519 | **983** | 2762 | 2478 | **5240** |
| **2716** | **Hingoli** | ZP | 1222 | 890 | **2112** | 181 | 165 | **346** | 1403 | 1055 | **2458** |
| **2717** | **Parbhani** | ZP | 3729 | 2986 | **6715** | 727 | 769 | **1496** | 4456 | 3755 | **8211** |
| **2718** | **Jalna** | ZP | 1592 | 1368 | **2960** | 241 | 245 | **486** | 1833 | 1613 | **3446** |
| **2719** | **Aurangabad** | Aurangbad Municipal Corporation | 561 | 476 | **1037** | 187 | 110 | **297** | 748 | 586 | **1334** |
| | | ZP | 2899 | 2332 | **5231** | 474 | 349 | **823** | 3373 | 2681 | **6054** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2720 | Nashik | Malegaon Municipal corporaion | 300 | 316 | **616** | 81 | 80 | **161** | 381 | 396 | **777** |
| | | Nashik Municipal Corporation | 543 | 403 | **946** | 142 | 103 | **245** | 685 | 506 | **1191** |
| | | ZP | 3978 | 3027 | **7005** | 920 | 686 | **1606** | 4898 | 3713 | **8611** |
| 2721 | Thane | Bhivandi Municipal Corporation | 322 | 304 | **626** | 71 | 90 | **161** | 393 | 394 | **787** |
| | | Kalyan Dombavali Municipal corporation | 246 | 175 | **421** | 73 | 67 | **140** | 319 | 242 | **561** |
| | | Mira Bhayandar Mnicipal Corporation | 173 | 120 | **293** | 34 | 15 | **49** | 207 | 135 | **342** |
| | | Navi Mumbai Municipal Corporation | 353 | 248 | **601** | 46 | 27 | **73** | 399 | 275 | **674** |
| | | Thane Municipal Corporation | 362 | 267 | **629** | 107 | 83 | **190** | 469 | 350 | **819** |
| | | Ulhasnagar Municipal Corporation | 223 | 160 | **383** | 71 | 88 | **159** | 294 | 248 | **542** |
| | | ZP | 1863 | 1514 | **3377** | 334 | 309 | **643** | 2197 | 1823 | **4020** |
| 2722 | Mumbai (BMC) | Mumbai Municipal Corporation | 1749 | 1427 | **3176** | 117 | 99 | **216** | 1866 | 1526 | **3392** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2723 | Mumbai Dyd | Mumbai (DYD) | 2002 | 1945 | **3947** | 2638 | 1915 | **4553** | 4640 | 3860 | **8500** |
| 2724 | Raigarh | ZP | 1799 | 1424 | **3223** | 469 | 438 | **907** | 2268 | 1862 | **4130** |
| 2725 | Pune | Pimpari Chinchwad Mnicipal Corporation | 558 | 447 | **1005** | 128 | 110 | **238** | 686 | 557 | **1243** |
| | | Pune Municipal Corporation | 1245 | 939 | **2184** | 420 | 349 | **769** | 1665 | 1288 | **2953** |
| | | ZP | 2434 | 1730 | **4164** | 353 | 277 | **630** | 2787 | 2007 | **4794** |
| 2726 | Ahmadnagar | Ahmadnagar Municipal Corporation | 456 | 288 | **744** | 181 | 169 | **350** | 637 | 457 | **1094** |
| | | ZP | 4097 | 3108 | **7205** | 1324 | 980 | **2304** | 5421 | 4088 | **9509** |
| 2727 | Bid | ZP | 3576 | 2585 | **6161** | 694 | 496 | **1190** | 4270 | 3081 | **7351** |
| 2728 | Latur | ZP | 1617 | 1358 | **2975** | 384 | 283 | **667** | 2001 | 1641 | **3642** |
| 2729 | Osmanabad | ZP | 2075 | 1668 | **3743** | 425 | 483 | **908** | 2500 | 2151 | **4651** |
| 2730 | Solapur | Solapur Municipal Corporation | 439 | 421 | **860** | 130 | 148 | **278** | 569 | 569 | **1138** |
| | | ZP | 2742 | 1755 | **4497** | 575 | 386 | **961** | 3317 | 2141 | **5458** |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **2731** | **Satara** | ZP | 4030 | 3024 | **7054** | 1171 | 1093 | **2264** | 5201 | 4117 | **9318** |
| **2732** | **Ratnagiri** | ZP | 1691 | 1306 | **2997** | 626 | 455 | **1081** | 2317 | 1761 | **4078** |
| **2733** | **Sindhudurg** | ZP | 1118 | 843 | **1961** | 496 | 363 | **859** | 1614 | 1206 | **2820** |
| **2734** | **Kolhapur** | Kolhapur Municipal Corporation | 421 | 326 | **747** | 149 | 106 | **255** | 570 | 432 | **1002** |
| | | ZP | 2469 | 1656 | **4125** | 745 | 520 | **1265** | 3214 | 2176 | **5390** |
| **2735** | **Sangli** | Sangali Municipal Corporation | 295 | 204 | **499** | 116 | 79 | **195** | 411 | 283 | **694** |
| | | ZP | 3464 | 2711 | **6175** | 1500 | 1554 | **3054** | 4964 | 4265 | **9229** |
| **2736** | **Palghar** | ZP | 2230 | 1880 | **4110** | 424 | 341 | **765** | 2654 | 2221 | **4875** |
| **Grand Total** | | | **87234** | **67895** | **155129** | **25282** | **21381** | **46663** | 112516 | 89276 | **201792** |

**यशोगाथा**

**जिल्हा परिषद हिंदी वरिष्ठ प्राथमिक शाळा**

**पांजरा केंद्र - कामठा, जिल्हा गोंदिया**

**श्री प्रमोदकुमार भोजराज बघेल**

गोंदिया जिल्ह्यातील पांझरा नावाचे छोटेसे गाव. या गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये ०४.०४.२०१६ ला वैभव नावाच्या एका मुलाला पहिल्या वर्गात दाखल केले. फक्त त्याचे नाव शाळेत दाखल होते. तो शाळेत कधीच आला नव्हता. मार्च २०१८ मध्ये श्री प्रमोद्‌कुमार बघेल सरांच्या मनात वैभवला शाळेत आणण्याचा व शिकवण्याचा विचार आला. त्याविषयी चिंतन सुरु झाले. नुकतेच फेब्रुवारी २०१८ मध्ये श्री.बघेल सरांनी समावेशित शिक्षणाचे प्रशिक्षण पूर्ण केले होते आणि या प्रशिक्षणातून प्रेरणा घेवून सर कामाला लागले.

सर त्याच्या घरी गेले व त्याच्या आजोबासोबत चर्चा केली. जन्मापासून दोन वर्षापर्यंत वैभव फक्त सुस्त पडून राहायचा. त्याला चालता येत नव्हते. त्याचे पाय कमकुवत (लुळे) होते. त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरु होते. पाय सरळ व्हावे म्हणून त्याचे मानेपर्यंत शरीर अर्धा ते एक तास वाळूत पुरून ठेवायचे. असे सगळे प्रयत्न कुटुंबीय करीत होते. त्याचे पालक खूप चिंतेत होते. सर्वांच्या प्रयत्नातून वयाच्या चौथ्या वर्षी वैभव चालू लागला; पण तो पर्यंत वैभव ९०% मतीमंद असल्याचे निष्पन्न झाले होते.

शाळेत दाखल झाल्यानंतर २ वर्षांनी श्री बघेल सर, त्याच्या घरी गेले. वैभव ला शाळेत पाठवा तो शिकेल अस पालकांना सांगू लागले पण पालक त्याला शाळेत पाठवायला तयार नव्हते. त्याची आर्थिक परिस्थिती खूपच नाजूक होती. घरचे सगळे कामाला जात होते; पण त्याच्या आईला त्याच्या कडे लक्ष् ठेवण्यासाठी घरीच थांबावे लागायचे. घरचे सगळे लोक खूप चिंतेत होते. खरच हा शाळेत बसेल का? इतर मुले त्याला चिडवतील, खरच काही शिकू शकेल का? हे प्रश्न त्याच्या घरच्यांना सतावत होते. सरांनी घरच्यांचा विश्वास संपादन केला. वैभव शाळेत येऊ लागला. सुरुवातीला तो आई सोबत यायचा आई व तो १ तास वर्गात बसायचे. हळूहळू वर्गात बसण्याचा वेळ वाढवण्यात आला. काही दिवसांनी वैभव आई शिवाय वर्गात बसायला तयार झाला. इतर मुलांसोबत त्याच्या वस्तूंची, डब्यातील जेवणाची देवाण-घेवाण सुरु झाली. आपोआपच इतर मुले त्याची काळजी घेऊ लागले. त्याला मदत करू लागले. वैभवच्या सामाजिकीकरणाला सुरुवात झाली होती.

स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी त्याची सर्वाना ओळख करून दिली. स्वच्छ गणवेश, बुटमोजे, दप्तर, छान भांग काढलेला, टाय लावलेला वैभव छान दिसत होता. त्याच्यामध्ये आत्मविश्वास आलेला होता. कार्यक्रमात त्याला अध्यक्षस्थान दिले. स्वागत केले. शाळेत आले की सगळे एकमेकांना गुड मॉर्निंग म्हणत असत. तसेच वैभव ला पण सगळे गुड मॉर्निंग म्हणू लागले. शाळेत तर सर्वाना वैभवची ओळख झाली; पण आता गावातही वैभवचे नाव सगळे घेत होते. अर्थात यामागे सरांची मेहनत होती. त्यांची चिकाटी, संयम,संवाद,सातत्याने प्रयत्न करून एखादे काम पूर्णत्वास नेण्याची जिद्द वाखाणण्याजोगी होती.

वैभव हळूहळू बोलू लागला. गाण्याच्या तालावर नाचू लागला शाळेतील गेटमधून एकटा येऊन आपल्या जागेवर जावून बसू लागला. सूचनेनुसार विविध कृती तो करतो, हसतो, रडतो, भावना व्यक्त करतो. आजोबासोबत त्यांच्यामागे शेतात जातो. स्मित हास्य करतो हात मिळवितो इतरांचे अनुकरण करतो. तो खऱ्या अर्थाने शिकता झालेला आहे. त्याच्यातील हा बदल पाहून घरचे आनंदी आहेत. यांमागे कुटुंबियांचे सहकार्य,प्रयत्न,सर्व शिक्षकांची मानसिकता, त्यांचा दृष्टीकोन व मुख्याध्यापकाचे नेतृत्व, बघेल सरांची कृती महत्त्वाची आहे.

 

**चिंतनात्मक प्रश्न**

१.वैभवच्या समायोजनात बघेल सरांच्या भूमिकेचे महत्व स्पष्ट करा.

२.श्री.बघेल सरांनी वैभवच्या घरी जाऊन त्याच्या कुटुंबियांशी चर्चा केली नसती तर.....

## यशोगाथा

### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माहूरकुडा, जि.गोंदिया

### रुमन सूर्यभान मानकर (विशेष शिक्षिका)

गोंदिया जिल्ह्यातील माहूरकुडा नावाच्या गावामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये शिकणारा हा मुलगा. त्याचे नाव **सोहम महेश डोंगरे** तो १० वर्षाचा असून इयत्ता २ री मध्ये शिकतो. सोहम सेरेब्रल पाल्सी मेंदूचा पक्षाघात या आजाराने ग्रस्त आहे. त्याचे वडील शेती करतात. परिस्थिती साधारण, आहे. आईवडिलांचे सोहमकडे विशेष लक्ष आहे. पालक सर्व सार्वजनिक कार्यक्रमामध्ये त्याला सोबत नेतात. सोहम जन्माच्या वेळी रडला नाही. त्याला ऑक्सिजन मिळाला नाही असा समज झाला. तो चार वर्षाचा होईपर्यंत दुरुस्त होईल अशी आशा आईवडिलांना वाटली. त्यामुळे त्याच्यावर उपचार देखील केले नाही. ३ वर्षाचा होईपर्यंत तो आधाराशिवाय उभा राहू शकत नव्हता. चालत नव्हता.तो आठ वर्षाचा झाल्यावर समावेशित शिक्षण अंतर्गत त्याला शाळेत, दाखल करण्यात आले. सोहमच्या शिक्षणाबाबत मुख्याध्यापक, शिक्षक,विशेष शिक्षक,पालक यांच्या समन्वयाने चर्चा घेण्यात आली. त्याच्या गतीने त्याला पुढे जाण्यासाठी मदत करण्याचे ठरले. मदतनीसाच्या मदतीने त्याला शाळेत ने-आण करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच विशेष शिक्षिका रुमन मानकर यांची भूमिका महत्वाची होती.विशेष शिक्षिकेने प्रथम नियमित भेटीच्या माध्यमातून सोहमच्या प्रगतीबाबत विशेष लक्ष पुरविले. त्यांनी पालकांना रोलेटर या साहित्याची माहिती दिली व साहित्य उपलब्ध करून दिले. रोलेटरच्या सहाय्याने तो चालायला धावायला शिकेल असा विश्वास वाटला. त्याला डॉ. राऊत यांनी (फ़िजिओथेरीपिस्ट) व्यायामाच्या टिप्स सांगितल्या.पालक व विशेष शिक्षक यांच्या माध्यमातून घरी दररोज व्यायाम करीत होता. हा नित्यक्रम दीड ते दोन वर्षापर्यंत चालू होता. हळूहळू सोहम आधाराच्या सहाय्याने उभे राहणे शिकला. त्याला चालताना त्रास होत होता. त्याचा फ़िजिओथेरीपी

चा सराव वाढविण्यात आला. रोलेटरच्या सहाय्याने एक एक पाय समोर टाकून चालण्याचा भरपूर सराव केला. रोलेटर व फ़िजिओथेरीपीमुळे त्याचे स्नायू बळकट झाले, आणि तो चालू लागला.सध्या सोहम स्वतंत्रपणे पायी चालत आईसोबत शाळेत येतो. त्याचा शारीरिक विकास झालेला आहे. आधी तो कोणासोबत बोलत नव्हता, खेळत नव्हता, परंतु आता तो मित्रासोबत, शिक्षकासोबत, बोलतो, खेळतो.मुलासोबत रांगेत बसून जेवण करतो. सामान्य मुलांचे अनुकरण करतो. पेन्सिल पकडतो. लिहिण्याचा प्रयत्न करतो. मॅडमला वही दाखवितो. शिक्षक वर्गात येताच अभिवादन करतो. त्याच्यासोबत शिक्षक, मित्र-मैत्रिणी येता-जाता बोलतात. त्याचा परिपाठात सहभाग असतो. कृतियुक्त गाण्यामध्ये तो सहभागी असतो. खेळ खेळतो. त्याची इतर वर्गमित्रांसोबत आंतरक्रिया होत असते. शिक्षकांनी सांगितलेल्या कृती तो करतो. त्याच्या मानसिक भावनिक व सामाजिक विकासास सुरुवात झाली आहे. आता सोहम शाळेत रमला आहे.

**चिंतनात्मक प्रश्न**

१.सोहम ला गरजेप्रमाणे साहित्य उपलब्ध झाल्यामुळे त्याच्यात कोणता बदल झाला?
२.अनुकरणातून शिकणे हे सोहमच्या समायोजनासाठी कसे उपयुक्त ठरले?

## राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या शिक्षणाच्या संदर्भाने केलेल्या शिफारसी

सामाजिक न्याय आणि समता मिळवण्यासाठी शिक्षण हे एकमेव सर्वात मोठे साधन आहे. शिक्षण व्यवस्थेचे उद्दिष्ट भारतातील मुलांना लाभ पोहोचवणे हे असावे. विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी किंवा परिस्थिती यामुळे कुठलेही मूल शिकण्याची व प्रगतीची संधी गमावणार नाही याची राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० पुष्टी करते. हे धोरण विशेष गरजा असणाऱ्या किंवा दिव्यांग मुलांना इतर सामान्य मुलांसमान गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त करण्याच्या संधी देणारी सक्षम यंत्रणा निर्माण करण्याचे महत्व देखील निर्धारित करते.नवीन धोरणानुसार दिव्यांग मुलांना पायाभूत स्तरावरून उच्च शिक्षणापर्यंतच्या नियमित शिक्षण प्रक्रियेमध्ये पूर्ण रूपाने सहभागी होण्यासाठी सक्षम केले जाईल.

- Right of Person with Disability Act समावेशित शिक्षणास एक अशी शिक्षण प्रणाली म्हणून परिभाषित करतो. ज्यात सामान्य व दिव्यांग सर्व मुले एकमेकासोबत शिकतात आणि वेगवेगळ्या दिव्यांग मुलांच्या अध्ययन गरजा पूर्ण करण्यासाठी अध्ययन अध्यापन पद्धतीत योग्य प्रकारे बदल केला जातो. हे धोरण दिव्यांग व्यक्तीचे अधिकार अधिनियम २०१६ (RPWD) तील तरतुदींशी पूर्णपणे सुसंगत आहे. शालेय शिक्षणाबाबत याद्वारे प्रस्तावित सर्व शिफारसीना पुष्टी देते. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार करतांना राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT) मार्फत दिव्यांग विभागाच्या राष्ट्रीयू संस्थासारख्या तज्ज्ञ संस्थाबरोबर सल्लामसलत करण्याबाबत NEP२०२० मध्ये नमूद केले आहे.
- NEP२०२० अनुसार मुलांचे एकात्मीकरण लक्षात घेऊन विद्यालयीन संकुल आवश्यक संसाधने उपलब्ध करून दिले जाईल. यासोबतच गंभीर अथवा एकापेक्षा अनेक विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी गाव, तालुका, जिल्हा स्तरावर जेथे गरज आहे तेथे एक संसाधन केंद्र स्थापन केले जाईल. उपयुक्त साधन सामुग्री मोठे प्रिंटर, ब्रेल लिपीतील पुस्तके मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून दिल्या जातील, तसेच राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्था NIOS ही संस्था भारतीय संकेत भाषा शिकण्यासाठी, भारतीय संकेत

भाषेचा उपयोग करून अन्य मूलभूत विषय शिकण्यासाठी उच्चस्तर गुणवत्तापूर्ण घटकसंच विकसित करेल. यासोबतच सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर लक्ष दिले जाईल.

- गंभीर स्वरूपाचे आजार व बहुविकलांग मुलांसाठी गृह आधारित (Home Based) शिक्षणाचा पर्याय असेल. गृह आधारित शिक्षणातील दक्षता आणि प्रभावशीलता याची समता आणि समतेच्या संधी याबाबतीत चाचणी घेऊन समानता या सिद्धांतावर आधारित लेखापरीक्षण केले जाईल. मुलांचे पालक, देखभाल करणारे, शिक्षक सर्वासोबत चर्चा करून त्यांना आवश्यक साधनसामुग्री/ तंत्रज्ञानावर आधारित साधन उपलब्ध करून देण्यात येईल. या माध्यमातून देखरेख करणारे व मातापिता मुलांच्या गरजाप्रमाणे सक्षमपणे मार्गदर्शन करू शकतील.
- बहुतांशी वर्गामध्ये विशिष्ट अध्ययन अक्षम असलेली मुले असतात. त्यांना सतत मदतीची गरज असते. ही मदत जेवढ्या लवकर सुरु केली जाईल तेवढ्या लवकर मुलांची प्रगती होण्याची शक्यता असते. असे आता संशोधनातून स्पष्ट झाले आहे. या मुलांना त्यांच्या गतीनुसार काम करण्याचे स्वातंत्र्य देणे प्रत्येक मुलांच्या क्षमतांचा लाभ घेण्याच्या दृष्टीने पाठ्यक्रमात प्रत्येकासाठी सक्षम व लवचिक आणि उपयुक्त मूल्यांकन पद्धती वापरण्याबाबत शिफारस राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये करण्यात आलेली आहे.

विशिष्ट दिव्यांगत्व असलेल्या मुलांना (अध्ययन अक्षमता असलेली) कशाप्रकारे अध्यापन करावे याबाबतीत जागरूकता आणि माहितीचा अंतर्भाव सर्व शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचा अत्यावश्यक भाग असावा. असेही NEP २०२० मध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

**विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समायोजनात शालेय नेतृत्वाची भूमिका –**

शाळेतील प्रत्येक मूल शिकावं ही जबाबदारी शिक्षक,पालक यासोबतच शाळेच्या मुख्याध्यापकाची सुद्धा असते. यामध्ये शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याचा गुणवत्ता विकास करायचा आहे. शाळेत वेगवेगळया प्रकारचे वेगवेगळया वातावरणातून आलेले विद्यार्थी असतात. वर्गात शिकवलेले काही मुलांना लगेच समजते. काही मुलांना तिच गोष्ट समजायला वेळ लागतो. प्रत्येकाचा वैयक्तिक विचार केला तर त्यामागची वेगवेगळी कारणे, अडचणी मुख्याध्यापकाला कळतील. प्रत्येक शाळेत काही मूले विशेष गरजा असणारी आहेतच. त्यांना नेमकी कोणती सुविधा पुरविली तर ते मूल शैक्षणिक प्रवाहात व्यवस्थितपणे सहभागी होऊ शकेल. याची जाणीव मुख्याध्यापकांना असावी. प्रत्येक विद्यार्थ्याला ती सुविधा पुरवून त्याचा गुणवत्ता विकास साधणे ही मुख्याध्यापकाची जबाबदारी आहे.

- शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला (विशेष गरजा असणाऱ्या) गुणवत्ता विकासासाठी संधी मिळण्याची व्यवस्था करणे.
- शाळेतील (विशेष गरजा असणाऱ्या) विद्यार्थ्याची माहिती घेवून त्यांच्या शिकण्यामधील अडचणी, वैयक्तिक समस्या समजून घेणे.
- विद्यार्थ्यांच्या गरजेप्रमाणे त्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे
- विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्थितीबद्दल आढावा घेणे.
- आवश्यकता असल्यास शिक्षकांना व विद्यार्थ्यांना समुपदेशन करणे.
- शाळेतील CWSN विद्यार्थ्यासोबत व त्यांच्या पालकांसोबत उचित संवाद साधणे , मार्गदर्शन करणे.
- CWSN विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे.

✧ CWSN विद्यार्थ्यांना शासनाच्या उपलब्ध सुविधा मिळाव्यात यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे

हे मोड्यूल शाळेच्या मुख्याध्यापकांसाठी एक दिशादर्शक ठरणारे आहे. महाराष्ट्रातील काही यशस्वी मुख्याध्यापकांच्या यशोगाथा या मोड्यूल मध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्यातून इतरांना नक्कीच प्रेरणा मिळेल. या कामात विविध स्तरावर कोणती आव्हाने येवू शकतात? याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे.या मोड्यूलच्या अभ्यासातून शाळा नेतृत्व व सहकारी यांच्यासाठी नक्कीच सर्वांना उपयुक्त ठरणारे हे मोड्यूल आहे .

**संदर्भ सूची -**


1. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नागपूर समावेशित शिक्षण अंतर्गत वर्ग अध्ययन-अध्यापन व मूल्यमापनाच्या वेळी आव्हानात्मक संकल्पनाबाबत अध्यापन तंत्र पद्धती प्रशिक्षण संदर्भ संचिका २०१९-२०
2. भारत का राजपत्र The Right of Persons With Disability Act 2016 दिनक २७ डिसेंबर २०१६
3. इयत्ता १ ली ते १२ पर्यंतच्या विशेष गरजा असणार्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार मूल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलती संदर्भात मार्गदर्शक सूचना
4. शासन निर्णय क्रमांक: पीआई/२०१७/(११८/१)/एस.डी-६ दिनांक १६ ऑक्टोबर २०१८
5. शासन निर्णय क्रमांक: पीआई/२०१०/(१३६/१)/ प्राशी-५ दिनांक २० ऑगस्ट २०१०
6. आशा परुळेकर १९९६ चाकोरीबाहेरील मुले पुणे उन्मेष प्रकाशन
7. सुप्रिया काळे (२००५) अपंग समावेशित शिक्षण मुंबई: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद जवाहरलाल भवन नेताजी सुभाष मार्ग मुंबई
8. अ.मु.बेडगे (२००५) समावेशित शिक्षण प्राथमिक शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका पुणे: महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद २००५
9. जोशी व प्रा. कदम व जाधव (२०११) विशेष शिक्षण नागपूर विद्या प्रकाशन रुईकर रोड महाल.
10. https://youtu.be/QJKLdpMnKdQ



| **मोड्यूल विकसक** | **समन्वयन** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| डॉ.सीमा पुसदकर | डॉ.ज्योती कुलकर्णी | श्री.रमाकांत काठमोरे |
| अधिव्याख्याता | समन्वयक | संचालक |
| प्रादेशिक विद्या प्राधिकरण, नागपूर. | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |